महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय वजिराबाद, नांदेड

दुरध्वनी क्रमांक: 02462-244474, 234255 फॅक्स क्रं 02462-235103
E mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

पीआरओ तळमजला खोली क्रमांक -17
पोलीस अधीक्षक कार्यालय वजिराबाद, नांदेड-431601

**PRESS NOTE** दिनांक 22.08.2025.

## कंधार पोलीसांनी दरोड्याचा गुन्हा उघडकीस आणुन आरोपीस अटक करुन एकुण 63,900/-रु चा मुद्देमाल केला जप्त..

| पोलीस ठाणे | गु.र.न. व कलम | फिर्यादीचे नाव व पता |
|---|---|---|
| **कंधार** | गु र नं 293/2025 कलम-310(2) बिएनएस | धोंडीबा नामदेव राठोड,वय 36 वर्षे,रा.लिंबातांडा ता.कंधार जि.नांदेड |
| **माहीती कशी प्राप्त झाली** | **गुन्हा घडला तारीख वेळ** | **गुन्हा दाखल तारीख वेळ** |
| **तक्रारीवरुन** | दिंनाक 20/08/2025 चे 20.30 ते 20.45 चे दरम्याण भोजुवाडी ते लिंबातांडा दरम्याण ता.कंधार जि.नांदेड | दिंनाक 21/08/2025 रोजी 12.38 वाजता |

**गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार**

**श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक साहेब नांदेड (IPS)**
**श्रीमती अर्चना पाटील,अपर पोलीस अधीक्षक भोकर**
**श्री. सुरज गुरव,अपर पोलीस अधीक्षक नांदेड**
**श्रीमती डॉ.अश्विनी जगताप, पोलीस उप-अधीक्षक उपविभाग कंधार**
**यांचे मार्गदर्शनाखाली**
**पोनि /चंद्रकांत जाधव, पोउपनि/ ए एम सानप, पोहवा /बाजाजी गारोळे, श्रीपती गायकवाड, पोकॉ/कोंडापुरे, मपोकॉ/दुर्गा जाधव सर्व नेम.पोस्टे कंधार**

**आरोपीचे नाव व पत्ता**

1)आकाश सदाशीव राठोड वय 23 वर्षे रा लिंबातांडा 2)रोहीत गंगाधर देशमुख वय 20 वर्षे,रा वैदु कॉलणी, कंधार 3)पवन शिवाजी सावंत वय 25 वर्षे रा रामरहीम नगर,कंधार 4)शेख फेरोज शेख खाजामिया वय 22 वर्षे रा वैदुकॉलणी,कंधार 5)आकाश शिवाजी सावंत वय 20 वर्षे रा रामरहीम नगर,कंधार

**गुन्हयाची हकीकत**

**मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट** अंतर्गत माली गुन्हे उघडकीस आणण्याचे व पाहीजे, फरारी आरोपीचा शोध घेणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते.

त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन कंधार येथे दिनांक 21.08.2025 रोजी गु.र.नं. 293/2025 कलम 310(2) बि एन एस प्रमाणे गुन्हा दाखल असुन थोडक्यात हकीकत अशी की यातील फिर्यादी हे दि.20/08/2025 रोजी कंधार येथे नातेवाईकांची सोन्याची अंगठी विकुण आलेले चाळीस हजार रुपये घेवुन लिंबातांडा येथे जात असतांना फिर्यादीचे भावकीतील आरोपी नामे आकाश सदाशीव राठोड रा लिंबातांडा याने व त्याचे अनोळखी चार साथीदार यांनी दरोडा टाकुन फिर्यादी यांचेकडील चाळीस हजार रुपये जबरीने काढुन घेवुन पळुन गेले वगैरे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन कंधार येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयातील आरोपींचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणने बाबत पोनि चंद्रकांत जाधव यांनी पोलीस पथकास आदेशीत केले असता नमुद पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ तपास चक्रे फिरवुन गोपनीय बातमीदार यांचे मार्फतीने यातील आरोपी नामे 1)आकाश सदाशीव राठोड वय 23 वर्षे रा लिंबातांडा यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करुन त्याचे इतर साथीदार नामे नामे 2)रोहीत गंगाधर देशमुख वय 20 वर्षे,रा वैदु कॉलणी, कंधार 3)पवन शिवाजी सावंत वय 25 वर्षे रा रामरहीम नगर,कंधार 4)शेख फेरोज शेख खाजामिया वय 22 वर्षे रा वैदुकॉलणी,कंधार 5)आकाश शिवाजी सावंत वय 20 वर्षे रा रामरहीम नगर,कंधार यांना ताब्यात घेवुन सर्व आरोपींवर अटकेची कारवाई करुन आरोपींकडुन रोख 13,900/-रु रक्कम व दोन मोटर सायकल असा एकुण 63,900/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

पोस्टे कंधार पोलीस पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल मा.श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड**